दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक २६३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१७ डिसेंबर २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

नव्या कृषी कायद्यामुळे शेतकरी देशोधडीला लागणार : प्रकाश आंबेडकर

दै.रायगड नगरी । मुंबई

दिल्ली सीमेवर देशातभरातून आलेले शेतकरी गेल्या २० दिवसांपासून थंडीत कुडकुडत आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करत आहे. केंद्र सरकारने लॉकडाऊनच्या काळात शेतीसंबंधी तीन नवीन कायदे चर्चा न करता संसदेत संख्याबळाच्या आधारावर मंजूर करून घेतले. या नवीन कायद्यामुळे भारतीय शेतकरी देशोधडीला लागणार आहे, असे मत व्यक्त करत शेतकरी आंदोलनाला पाठिंबा असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

जागतिकीकरण आणि त्यामागून अपरिहार्यपणे येणाऱ्या खाजगीकरणातून शेतकऱ्यांचा शेतमाल कवडी मोलाने विकत घेण्याची मुभा आणि त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या जमिनी गिळंकृत करण्याचा राजमार्ग या नवीन विधेयकात आहे. केंद्र सरकारने हा शेतकरी विरोधी कायदा मागे घेतला पाहिजे, ही वंचित बहुजन आघाडीची मागणी आहे. तसेच, या मागणीसाठी चालू असलेल्या शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी वंचित बहुजन आघाडी धरणे आंदोलन करणार आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

जेएनपीटी बंदरातील कामगारांसाठी रस्त्यावर उतरू : खा.श्रीरंग बारणे

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

बंदर हे शेतकऱ्याच्या त्यागातून व हुतात्म्यांच्या बलिदानातून निर्माण झाले आहे. आपल्या सर्वस्वाची होळी करणाऱ्या प्रकल्पग्रस्त जनतेच्या समस्या जैसे थे ठेऊन जेएनपीटी बंदराचे खाजगीकरण करून जेएनपीटी बंदरातील कर्मचाऱ्यांना संकटात टाकणाऱ्या केंद्रसरकार विरोधात प्रसंगी रस्त्यावर उतरू असा इशारा मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिला आहे.

केंद्र सरकारने जेएनपीटी बंदराचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला असून या निर्णय विरोधात आज जेएनपीटी कामगारांनी जेएनपीटी प्रशासन भवनावर पीपीपी हटवा जेएनपीटी कंटेनर टर्मिनल बचावचा नारा देत प्रचंड मोर्चा काढला होता. पोलिसांनी हा मोर्चा कासव चौकात अडविल्यावर त्याचे सभेत रूपांतर झाले. जेएनपीटी कामगार एकता संघटना, न्हावा शेवा बंदर कामगार संघटना आणि जेएनपीटी वर्कर्स युनियन या संघटनांच्या माध्यमातून आयोजित या मोर्चात शेकडो कामगार सहभागी झाले होते. या कामगारांना पाठिंबा देण्यासाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे आणि रायगड चे खासदार सुनिल तटकरे आवर्जून उपस्थित होते.यावेळी खासदार बारणे यांनी आपली भूमिका विशद केली.

देशातील सर्व बंदराच्या उत्पन्नापैकी केंद्र सरकारला ३५ टक्के उत्पन्न एका जेएनपीटी बंदरातून मिळत असताना काही भांडवलदारांच्या फायद्यासाठी केंद्र सरकार जेएनपीटी बंदराचे खाजगीकरण करीत असेल तर ते शिवसेना कधीही सहन करणार नसल्याचे खासदार बारणे यांनी स्पष्ट केले. या खाजगीकरण प्रश्नाबाबत केंद्रीय बंदर विकास मंत्री मनसुख मालवीय यांच्याबरोबर सविस्तर चर्चा केल्यावर जेएनपीटी बंदराच्या खाजगिकरणाचा कसलाही विचार नसल्याचे त्यांनी सांगितले होते. मात्र देशाच्या चौकीदाराने आक्ख बंदरच विकायला काढल्याने शिवसेना त्याला प्रखर विरोध करेल असे सांगून प्रसंगी आम्ही रस्त्यावर उतरू असा इशारा शेवटी खासदार श्रीरंग बारणे यांनी यावेळी दिला.

यावेळी रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांनी केंद्र सरकारने शिवरायाच्या भूमीतील भूमीपुत्रांशी वाकडे घेऊ नका असे सांगून आता राज्यात महाविकास आघाडी सरकार असल्याने कुठल्याही कामगारांविरोधी निर्णय घेऊ देणार नसल्याचे ठणकावून सांगितले. तसेच देशाचे नेते शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जेएनपीटी बंदराच्या पीप–ीपी धोरणा विरोधात महाविकास आघाडीचे सर्व खासदार केंद्र सरकारला जाब विचारल्याशिवाय स्वतः बसणार नाही. तसेच जेएनपीटी बंदराच्या प्रशासन येथील प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न, दोन गावांच पुनर्वसन आणि रुग्णालयाचा प्रश्न न सोडविता खाजगीकरणाचा डाव आखत असतील तर लोकनेते दि.बा.पाटलांचा भूमिपुत्र हे कदापी सहन करणार नाही. आणि अशा भूमिपुत्रांच्या मागे या पुढेही आम्ही राहणार आहोत असे शेवटी खासदार तटकरे यांनी सांगितले

यावेळी जेएनपीटी कामगार एकता संघटनेचे अध्यक्ष तथा ट्रस्टी दिनेश पाटील, न्हावा शेवा बंदर कामगार संघटना जनरल सेक्रेटरी तथा ट्रस्टी भुषण पाटील, जेएनपीटी वर्कर्स युनियन जनरल सेक्रेटरी तथा माजी ट्रस्टी रवि पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कामगारांनी पीपीपी हटवा जेएनपीटी कंटेनर टर्मिनल बचाव, चेअरमन संजय सेठी व्हा चेअरमन उन्मेश वाघ चले जाव चा नारा दिला. याप्रसंगी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख बबन दादा पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, इंटकचे राष्ट्रीय नेते तथा कामगार नेते महेंद्र घरत, अँड विजय पाटील, प्रा.एल.बी.पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, उरण उत्कर्ष समितीचे गोपाळ पाटील, संजय ठाकूर, यांचीही समयोचित भाषणे झाली.

यावेळी उपजिल्हा प्रमुख नरेश रहाळकर, कामगार नेते तथा ट्रस्टी दिनेश पाटील, कामगार नेते तथा ट्रस्टी भूषण पाटील, माजी ट्रस्टी रवि पाटील, कामगार नेते सुधिर घरत, कामगार नेते सुरेश पाटील, कामगार नेते महादेव घरत, ग्राहक संरक्षण कक्षाचे जिल्हाप्रमुख रमेश म्हात्रे, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, तालुका संघटक बी.एन.डाकी, शेकापचे चिटणीस मेघनाथ तांडेल, शेकापक्षाचे उरण तालुका युवक संघटना अध्यक्ष तथा कामगार नेते रवि घरत, रमाकांत म्हात्रे, उरणचे सभापती सागर कडू, उपसभापती शुभांगी पाटील, जि प सदस्य बाजीराव परदेशी, पं स सदस्य नरेश घरत, महिला नेत्या सिमाताई घरत, काँग्रेस पार्टीचे इंटक युवा अध्यक्ष राजेंद्र भगत, सुरेश पाटील, भावना घाणेकर मनोज भगत, गणेश घरत, सुरेश ठाकूर आदी मान्यवर व शेकडो कामगार उपस्थित होते.

संक्षिप्त...

हर्षवर्धन जाधव यांना १८ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी

दै.रायगड नगरी । पुणे

ज्येष्ठ दाम्पत्याला मारहाण केल्याप्रकरणी कन्नडचे माजी आमदार हर्षवर्धन जाधव (वय ४३) यांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एम. पी. परेदशी यांनी बुधवारी (दि. १६) १८ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी अमन चड्डा (वय २८, रा. बोपोडी) यांनी चतु:श्रृंगी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. ही घटना १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास औंध येथील संधवीनगर येथे घडली होती. यात अजय चरणजितलाल चड्डा (वय ५५) आणि ममता अजय चड्डा (वय ४८) हे जखमी झाले आहेत.

अजय चड्डा व ममता चड्डा हे दुचाकीवरुन जात असताना हर्षवर्धन जाधव यांच्या गाडीचा दरवाजा अच–ानक उघडल्याने त्यात ममता चड्डा यांच्या पायाला लागले. त्याबाबत त्यांनी जाब विचारला असता जाधव यांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यांच्याबरोबरील महिला इषा बालाकांत झा (वय ३७, रा. वाकड) यांनीही शिवीगाळ करीत हाताने मारहाण केली. चड्डा यांनी आपली हृदयशस्त्रक्रिया झाली असल्याचे सांगितल्यानंतरही जाधव यांनी मारहाण केली. त्यानंतर चड्डा यांच्या मुलांनी दोघांना रुग्णालयात नेल्यानंतर त्यांना वाटेत जाधव यांची गाडी जाताना दिसली. ते त्याच्या मागोमाग गेले. आंबेडकर चौकाच्या अलिकडे जाधव यांच्या गाडीने आणखी एकाला धडक दिल्याने तेथे लोकांनी जाधव यांना मारहाण केली.

अनैतिक संबंधातून खून करून फरार झालेल्या आरोपीस पोलिसांकडून अटक

दै.रायगड नगरी । पनवेल

फिर्यादी अक्षय रविंद्र गायकवाड वय २६ वर्षे रा. बौदधवाडी रोडपाली कळंबोली यांच्याकडे भाडेकरू म्हणून राहत असलेली काजल लाले व सलमा मियाँ. या गावावरून परत सदर ठिकाणी ०६/१२/२०२० रोजी १९. ३० वा. आले असता, सदर रूमचा दरवाजा बाहेरून लावला असल्याने याबाबत त्यांनी फिर्यादी यांचे सह दरवाजा उघडुन पाहिला असता मयत महिला श्रीमती लीपी सागोर शेख वय –२६ वर्षे,रा. घर नं ५४९, पहिला मजला, रूम नं. १, बौध्दवाडा,रोडपाली, कळंबोली ता.पनवेल. मुळ रा. देश– बांग्लादेश व्यवसाय–मोलमजुरी हि रूम मध्ये पालथ्या व कुजलेल्या अवस्थेत मिळुन आली. सदर महिलेचा कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरिता घरी पालथे पाडुन मागुन गळा दाबुन खून करून ती राहत असलेल्या खोलीचा बाहेरून दरवाजा लावुन पळुन गेला असल्याने सदरबाबत कळंबोली पोलीस ठाणेस गु.र.क २७४/ भादविसं कलम ३०२ अन्वये दि. ०६/१२/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा दाखल झालेनंतर गुन्हयातील आरोपी बाबत काहीही ठोस पुरावा व धागेदोरे नसताना गुन्हयाची उकल होणेसाठी विशेष पथक तयार करून तांत्रिक तपास व गोपनिय बातमिदारांकडुन माहिती घेवून गुन्हा करून फरार असलेल्या आरोपी वय २४ वर्षे रा.रूम नं.जुबेर चाळ, ए/३, हार्मोनी बिल्डिंग जवळ, खर्डी रोड,मुंब्रा, भारत गिअर कंपनीचे समोर, ता. ठाणे, जि.ठाणे यासं कौशल्यपुर्वक व शिताफिने ताब्यात घेवुन त्याच्याकडे ..../२

विविध विकासकामांचे आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आज(बुधवारी) पनवेल महानगरपालिकेच्या विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आले.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील जुई गा–वातील तलाव सुशोभिकरण, ओवेकॅम्प येथील गल्ली क्रमांक १, गल्ली क्रमांक, गल्ली क्रमांक ३ व गल्ली क्रमांक ४ रस्त्यांचे काँक्रीटीकरण, ओवे येथील गल्ली क्रमांक १, गल्ली क्रमांक २ आणि गल्ली क्रमांक ३ रस्त्यांचे काँक्रीटीकरण, पेठ येथील रस्ता काँक्रीटीकरण, हसन भाई मंजिल पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण, ओवेपेठ मंदिर जवळील रस्ता काँक्रीटीकरण, भोईरपाडा–तळोजे मजकूर येथे भोईरपाडा तळोजे मजकूर ते स्मशानभूमी रस्ता काँक्रीटीकरण, घोट येथे मुख्य रस्ता ते अभिमन्यू पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण, मुख्य रस्ता ते राजेश पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण, मुख्य रस्ता ते नितेश पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण, खिडूकपाडा येथील लक्ष्मीनारायण मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण, दत्त मंदिर लक्ष्मण ठाकूर यांच्या घरापर्यंत, लक्ष्मण ठाकूर यांच्या घरापासून अर्जुन ठाकूर यांच्या घरापर्यंत, व गुरुनाथ ठाकूर यांच्या घरापासून कुमार गुजराती दुकानापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण, त्याचबरोबर खिडूकपाडा गाव मुख्य कमान रस्ता काँक्रीटीकरण, तसेच मोठा खांदा येथील रस्ता दुरुस्ती करणे या कामांचा शुभारंभ झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, महानगरपालिकेचे स्थायी समिती सदस्य संतोष शेट्टी, प्रभाग समिती सभापती अनिता पाटील, हेमलता म्हात्रे, समीर ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, हरेश केणी, डॉ. अरुणकुमार भगत, बबन मुकादम, अमर पाटील, संतोष भोईर, पापा पटेल, प्रविण पाटील, नरेश ठाकूर, महादेव मधे, मुकीद काझी, विकास घरत, गोपीनाथ भगत, नगरसेविका चंद्रकला शेळके, शिला भगत, कामोठे मंडल अध्यक्ष रवी जोशी, .../२

नवी मुंबई गुन्हे शाखा, कक्ष २ कडून १० मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस

दै.रायगड नगरी । पनवेल

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातुन अनेक मोटार सायकली चोरी जात असल्याचे प्रमाण वाढल्याने मा. पो–लीस आयुकत बिपीन कुमार सिंह सो, नवी मुंबई, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, डॉ. बी. जी. शेखर पाटील सो, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, प्रविण पाटील सो, गा. सहा, पोलीस आयुक्त गुन्हे शाखा, विनोद चव्हाण सो, यांनी वेळोवेळी मिटींग घेवुन मोटार सायकल चोरीच्या गुन्ह्यंवर लक्ष केंद्रीत करण्याबाबत गुन्हे शाखेच्या सर्व शाखांना सुचना दिल्या होत्या. त्याबाबत विशेष पथके तयार करून, सदरचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत

सुचना दिल्या होत्या.

सदर गुन्ह्याच्या समांतर तपासादरम्यान दि. ११/१२/२०२० रोजी गुन्हे शाखा, कक्ष २, यांना गोपनीय बातमीदारामार्फत मोटार सायकल चोरी करणारा संशयीत आरोपी नामे आकाश राजेश कहार उफ साई हा पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने बातमीची खातरजमा करणेकामी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गिरीधर गोरे, गुन्हे शाखा, कक्ष २ पनवेल यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हददीत पनवेल रेल्वे स्टेशनजवळ ..../२

शेतकरी आंदोलनाच्या समर्थनार्थ सिंघू बॉर्डवर संत बाबा राम सिंह यांची गोळी झाडून आत्महत्या

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

कृषी कायद्यावर शेतकरी आणि केंद्र सरकार यांच्यातील तिढा काही सुटायचं नाव घेत नाही. शेतकरी जिथे गेल्या काही दिवसांपासून आपल्या मागण्यांवर ठाम असून दिल्लीच्या सीमांवर आंदोलन करत आहेत. या दरम्यान शेतकरी आंदोलनच्या समर्थनार्थ संत बाबा रामसिंह यांनी गोळी मारुन आत्महत्या केली आहे.

राम सिंह यांनी दिल्ली– हरयाणायेथील सिंघु बॉर्डरवर स्वत:ला गोळी मारुन आत्महत्या केली. राम सिंह यांनी सुसाईड नोटमध्ये लिहिले की, आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरलेल्या शेतकऱ्यांना पाहून दु:ख होते. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी काहीजण त्यांच्यासोबत उतरले तर काहीजणांनी त्यांच्यावर टीका केली. सरकार शेतकऱ्यांना न्याय देत नाही. अत्याचार करणे आणि अत्याचार सहन करणे हे पाप आहे. शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ अनेकांनी आपले पुरस्कार परत करुन त्यांना पाठींबा दिला. हा देखील अत्याचाराविरुद्ध उठवलेला आवाज आहे.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि काही शेतकरी संघटनांमधील ..../२

मृत बिबट्याचे मांस केले फस्त केल्याप्रकरणी दोघांना अटक

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

मृत अवस्थेत आढळलेल्या बिबट्याचे कातडे व नखे काढून मांस फस्त केल्याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. पनवेल मधील मोर्बे धरण लगतच्या जंगलात हा प्रकार घडला आहे. त्यांचे इतर दोन साथीदार फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाचे पोलीस नाईक सचिन टाके यांना पनवेल मधील एका व्यक्तीकडे वाघनखे असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक एन. बी. कोल्हटकर व सहायक निरीक्षक निलेश तांबे यांच्या पथकाने मोर्बी धरणालगतच्या जंगलातून दोघांना ताब्यात घेतले होते. चौकशीत

त्यांच्या पालेखुर्द येथील घरातून चार नखे व प्राण्याची कातडी आढळून आली. याबाबत वन विभागाला कळवले असता ती नखे व कातडी बिबट्याची असल्याचे उघड झाले. त्यानुसार गणपत पालकू लोभी (२६) व ..../२

माथेरान कपाडिया मार्केट सुशोभिकरणामध्ये भ्रष्टाचार : शिवाजी शिंदे

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान नगरपरिषदेचा माध्यामातून कपाडीयॉ मार्केटचे नुतनीकरणाचा नावाखाली भकासीकरण करुन लाखो रुपये लाटण्याचा प्रयन्त सुरू असल्याचा आरोप विरोधी पक्ष नेते नगरसेवक शिवाजी शिंदे यांनी केला आहे.

मागील दिड वर्षापासुन माथेरान नगरपरिषदेचा माध्यमातून कपाडीया मार्केटचा सुशोभीकरणाचे ७५ लक्ष रुपयाचे काम सुरु असुन सहा महिन्याची मुदत असताना ही मागील दिड वर्षे काम सुरु असुन फायरविंग इनफ्राकॉन कंपनीचा सब ठेकेदाराने निकृष्ट कामाचा सपाटा लावलेला आहे. हेरीटेज मालमत्ता असलेल्या मिळकतीचा मागील शंभर वर्ष पुर्ण झालेल्या व व्यवस्थित असलेल्या मालमत्तेचे नुतनीकरण फक्त उखळ पांढरे करायचे ह्या पद्धतीने काम चालु असून, यामध्ये प्रशासन व सत्ताधारी यांची भुमिकाकाहि संशयास्पद असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या सब ठेकेदाराचा काळा धंदा विरोधी पक्ष नेता शिवाजी शांताराम शिंदे यांच्या लक्षात आल्या नंतर त्यांनी नागरपालिकेकडे सदर कामाची माहिती मिळावी अशा स्वरूपाचा माहितीच्या आधीकारात पालिकेकडे लेखी अर्ज केला होता. त्यास कोणतेही उत्तर न मिळाल्याने त्यांनी पुन्हा अर्ज केला पण त्यास अजूनही उत्तर मिळाले नसल्याचे त्यांनी सांगितले.

माथेरान नगरपरिषदेत वर्षांन वर्ष सर्व कामात टाटा कंपनीचा पत्रा वापरण्याचे निश्चित केले असुन कपाडीया मार्केटचा कामात सदर सब ठेकेदाराने टाटा कंपनीचा पत्र्या ऐवजी नॉन ब्रॅडेड निकृष्ट दर्जेहीन पत्रा संपुर्ण मार्केटला घाई घडबडीत ठोकुन जनतेचा पैशाची लुट करत होता हि गोष्ट विरोधी पक्ष नेता यांच्या लक्षात आल्यावर प्रशासनाला जाब विचारुन लेखी निवेदन देण्यात आले. सदर गोष्ट अभियंत्याचा लक्षात आणून दिल्यावर अभियंतयाने असे सांगीतले कि सदर ठेकेदाराला ठोकलेले सगळे पत्रे पुन्हा काढुन ठरलेल्या दर्जाचे बसवुन घेण्यात येईल. सदरचे काम ठोकपट्टीने सुरू असून पालिकेने अशा ठेकेदारास काळ्या यादीत टाकून जनतेच्या पैशाची होणारी नासाडी थांबवावी अशी मागणी त्यांनी केली आहे येथे असलेल्या गाला धारक व्यापाऱ्यांनीही ह्या कामाविरोधात पालिका प्रशासनाकडे लेखी स्वरूपात तक्रार केली आहे पण अजून पर्यंत ह्या ठेकेदारावर कोणतीही कारवाई झालेली नाही.

लसीकरणाची दिशा

देशात करोनाच्या रुग्णसंख्येचा आलेख खाली येत असतानाच, या साथरोगाच्या विरोधातील लढाई अंतिम टप्प्यात येऊन पोहोचली आहे. अल्पावधीत प्रतिबंधक लस विकसित करण्याच्या प्रयत्नांना यश येत असून, ब्रिटन आणि अमेरिकेत सर्वसामान्यांना लस देण्यास सुरुवात झाली आहे. येत्या काही दिवसांत भारतातही लसीकरणाचा प्रारंभ होण्याची चिन्हे आहेत. देशातील एकशे तीस कोटींहून अधिक जनतेपर्यंत लस कमीत कमी वेळात पोहोचविणे आव्हानात्मक आहे. लसीच्या साठवणुकीपासून लस देण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळापर्यंत अनेक आव्हाने आहेत. योग्य नियोजनाद्वारे त्यांवर मात करणे शक्य आहे. त्यासाठी केंद्र, राज्य सरकार आणि महापालिका ते ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्था, यांच्यात समन्वयाची गरज आहे. आपल्याकडे नियोजनबद्ध पद्धतीने काही करण्याचा निर्णय झाला, की त्यातून पळवाटा शोधणारे अनेक असतात. कोव्हिड लसीकरणात असे होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. दसरा-दिवाळी या मोठ्या सणांनंतर डिसेंबरमध्ये कोव्हिडची दुसरी लाट येईल आणि ती कदाचित पहिल्या लाटेपेक्षा मोठी असेल, असे अंदाज वर्तविण्यात येत होते. त्यानुसार केंद्र आणि राज्यांनी, यापूर्वीच्या सर्वाधिक रुग्णसंख्येत वीस टक्क्यांची भर घालून रुग्णालये सज्ज ठेवण्याची तयारीही केली होती. सुदैवाने तसे झाले नसून, कोव्हिड रुग्णांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. मृत्यूदरही खालावला आहे. करोनाचा संसर्ग झालेल्यांची प्रत्यक्षातील संख्या ही 'सिरो' पाहणीतील संख्येपेक्षा अधिक असल्याचे अभ्यासकांचे मत असून, करोनाच्या विषाणूत बदल होत असल्याकडे अंगुलिनिर्देश केला जात आहे. करोनाबाबत प्रतिकारशक्ती वाढत असल्याचे मतही मांडले जात आहे; मात्र यामुळे लसीची गरज नाही, असे नाही. करोनाचा धोका लक्षात घेता आणि विविध देशांमध्ये त्याची आलेली दुसरी लाट पाहता लसीकरण गरजेचे आहेच; त्यामुळे देशात लसीकरणाच्या दिशेने होत असलेले प्रयत्न मनोबल उंचावणारे आहेत. साथरोग जगाला नवीन नाहीत. सुमारे शंभर वर्षांपूर्वीच्या फ्लूच्या साथीचा इतिहास करोनाने ताजा केला. येत्या काळात विषाणूजन्य साथींचे, नव्या रोगांचे आव्हान असल्याचे शास्त्रज्ञ सातत्याने सांगत असून, गेल्या दहा-पंधरा वर्षांत याची प्रचीतीही आली आहे. सार्स, स्वाइन फ्लू या साथींनी काही वर्षांपूर्वी हाहाकार उडविला होता; परंतु त्यांनी संपूर्ण जग असे व्यापले नव्हते. कोव्हिड-१९ची साथ मात्र जगभर होती आणि त्यामुळेच ती अलीकडच्या काळातील सर्वांत विनाशकारी साथ ठरली आहे. जगभरात आतापर्यंत सुमारे सात कोटींहून अधिक लोकांना करोनाचा संसर्ग झाला असून, बळींची संख्या सोळा लाखांहून अधिक आहे. लॉकडाउनसारख्या उपायांमुळे संपूर्ण जग सहा-सात महिने बंद राहिल्याने, जागतिक अर्थव्यवस्थेला याचा मोठा फटका बसला असून, कोट्यवधींवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. स्वाइन फ्लू वगैरे साथींची व्याप्ती मर्यादित राहिल्याने; तसेच त्यांवर परिणामकारक औषधही उपलब्ध झाल्याने, अर्थव्यवस्थेवर व सर्वसामान्यांच्या जगण्यावर दूरगामी परिणाम झाले नव्हते. त्या साथींमध्येही जगभरात काही लाख माणसे दगावली; पण त्याचा गवगवा झाला नाही. त्यांपैकी काही साथींवर प्रभावी लस कालांतराने शोधली गेली असली, तरी ती सर्वांना देण्याचा अट्टहास धरला गेला नाही. कोव्हिडमध्ये मात्र अघटित घडले. लॉकडाउनसारख्या कठोर उपायाला पर्यायच नसल्याचे सर्व जगाने मान्य केले; त्यामुळे माणसाचे जगणेच जणू थांबले. हे संपूर्ण वर्ष त्याच्याशी लपंडाव खेळण्यातच गेले. विद्यार्थी शाळांपासून, कामगार नोकरीपासून वंचित राहिले. शेतकऱ्यांवर कोणतीही बंधने घातली गेली नसली, तरीही त्यांच्या श्रमांवर आणि पर्यायाने उत्पादनावर मर्यादा आल्या. या साऱ्यातून सुटका होण्यासाठी, लस शोधण्याचे जोरदार प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी अब्जावधी रुपयांची गुंतवणूकही झाली. अथक प्रयत्नांनी सुमारे सहा महिन्यांनी त्याला यश येत असल्याचे चित्र आहे. ब्रिटन, रशिया, चीन येथे लस विकसित होत असताना, भारतातही स्थानिक; तसेच अन्य देशांच्या मदतीने लस तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच लस विकसित करणाऱ्या तिन्ही प्रयोगशाळांना भेट दिली. येत्या जानेवारीत लसीकरणास प्रारंभ होऊ शकेल, असे संकेतही दिले गेले आहेत. देशात करोनाची दैनंदिन रुग्णसंख्या कमी होत असल्याने, मृत्यूदर खाली येत असल्याने लस कशाला, असा प्रश्नही विचारला जात आहे; परंतु या चर्चेला काही अर्थ नाही. लस देण्याचा कार्यक्रम सुरू झाला, की किमान पुढील काही काळ आपण या रोगाला बळी पडणार नाही, असा दिलासा जनमानसात निर्माण होईल. निर्धास्त होऊन लोक आपल्या रोजच्या कामाला लागतील. देशाची आणि जगाची अर्थव्यवस्था जागेवर येण्यास याची नक्की मदत होईल; त्यामुळे लस जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत कमीत कमी वेळात पोहोचविणे आवश्यक आहे. करोना योद्ध्यांसहित ज्येष्ठ नागरिक आणि अन्य व्याधी असणाऱ्यांना ती प्राधान्याने देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे क्रयशक्ती नसलेल्या घटकांपर्यंतही ती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सरकारला आणि समाजाला पुन्हा खंबीरपणे उभे राहणे तितकेच गरजेचे आहे. हे सारे करतानाच करोनाला कोणत्याही परिस्थितीत डोके वर काढून द्यायचे नाही, यासाठीची किमान काळजी घेणेही आवश्यक आहे. गेल्या नऊ महिन्यांत ज्या संघटितपणे आणि धीराने आपण या संकटाचा मुकाबला केला, तोच निर्धार आणखी काही काळ आपण टिकवून ठेवू शकलो, तर निश्चितपणे उद्याच्या उज्ज्वल भविष्याचे आपण साक्षीदार होऊ शकू.

दि. १० व ११ डिसेंबरचा अवेळी पाऊस हापूसला मारक; कोकणात आंबा मोहोरण्यास सुरुवात मात्र थंडी वाढण्याची गरज

दै.रायगड नगरी । आगरदांडा

मुंबई दि. ११, कोकणात १० व ११ डिसेंबरला झालेला पाऊस व अभ्राच्छादित वातावरण आंब्यासाठी खास करून हापूससाठी मारक ठरणार असून त्यामुळे भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची दाट भीती आहे. दुसरीकडे कोकणात नोव्हेंबर पासून आंब्याला मोहोर फुटण्याची प्रक्रिया अंशताः सुरु झाली आहे. डिसेंबर महिन्यापासून रायगड जिल्ह्यातदेखील खास करून अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन, म्हसळे तालुक्यात आंब्यांच्या बागांना मोहोर फुटणे सुरु झाले आहे. मात्र डिसेंबर सुरु होऊन देखील म्हणावी तशी थंडी पडत नसल्यामुळे अपेक्षेप्रमाणे मोहोर दिसत नाही. हवामान बदलाचा परिणाम म्हणजे पहाटे थंडी जाणवते व दिवसभराचे तापमान हे नेहमीपेक्षा यावर्षी जास्त जाणवत आहे.

मागील ३/४ वर्षे अवेळी पाऊस, थ्रीप्स रोगाचा प्रादुर्भाव कोरोना लॉकडाऊन सारख्या आपत्तीमुळे आंबा उत्पादकसाठी खडतर गेली. यावर्षी तरी चांगले उत्पादन येईल अशी अशा त्यांना होती. मात्र सध्याचे अवेळी पाऊस, अभ्राच्छादित वातावरण पाहाता मोहोर संवर्धन करून सुपारी एवढा आंबा मोठा करणे हे उत्पादकासाठी आव्हानात्मक काम असते. सर्व बाबींचा विचार करता यावर्षीचा आंबा हंगाम लांबणीवर पडून मार्च २०२१ पूर्वी आंबा मंडईत येणे कठीण असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दिली. दुसरे म्हणजे याच काळात आंब्यावर रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होतो. मोहोरावर तुडतूड्याचे आक्रमण होते. यासाठी उपाययोजना म्हणून प्रोपेन फास ५०% १० मिली १५ लिटर पाण्यात मिश्रण करून फवारावे. तुडतूड्यानंतर भुरी येण्याची शक्यता आहे. यासाठी प्रभावी औषध म्हणून कंटाफ १मिली + तुडतूडेमुळे काळी बुरशी येते म्हणून मेन्कोझेव (च् ४५) २ ग्रॅम फवारावे. तुडतूड्याचे प्रमाण जास्त असेल व काळी बुरशी झालेली असेल तर ईमी डाक्लोंप्रीड १७% १/२ मिली + डायपेन कोनोझॉल २५% १/२ मिली ने फवारावे.

महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या माध्यमाने आंबा फवारणीबाबत शेतकरी बांधवाना मार्गदर्शन करण्यात येत आहे. आंब्याबरोबर मोठ्या प्रमाणात रायगड जिल्ह्यात व पालघर जिल्ह्यात भाजीपाल्याचे उत्पादन होते. अलिबाग तालुक्यात सफेद कांद्यांचे उत्पादन कार्ले खिंड, सागाव, तळवली, कार्ले, खंडाळे, वाडगाव, नेहुली ते कुरूळ पर्यंतच्या परिसरात होते. शासनाच्या विकेल ते विकेल या अभियाना अंतर्गत उत्पादक ते ग्राहक या पद्धतीचा अवलंब करून शेतकरी यांचे फलोत्पादन विकले जावे यासाठी संघ प्रयत्नशील असल्याची माहिती शेवटी अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दिली.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र प्रदान

दै.रायगड नगरी । पनवेल

कामोठे येथील वॅल्यु ऑफ स्माईल फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने महिलांकरिता आयोजित करण्यात आलेल्या व्यवसाय व स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबिरातील शिबिरार्थींना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

कामोठे येथे झालेल्या या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, महिला व बाल कल्याण समिती सभापती मोनिका महानवर, प्रभाग समिती सभापती हेमलता म्हात्रे, नगरसेविका कुसूम म्हात्रे, वॅल्यु ऑफ स्माईल फाऊंडेशनच्या अध्यक्षा हरजिंदर कौर हॅपी सिंग, आणि संस्थेच्या पदाधिकारी आदी उपस्थित होते.

कोविड काळात आर्थिक परिस्थिती ढासळली असल्याने अनेकांना ईच्छा असतानाही प्रशिक्षण घेता येत नव्हते. याची दखल घेत तीन वर्षांपासून सतत विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या वॅल्यु ऑफ स्माईल फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने महिलांसाठी शिवणकला, मेहंदी, ब्युटीपार्लर अशा विविध व्यवसाय आणि स्वयंरोजगार प्रशिक्षण ऑनलाईन पद्धतीने आयोजित केले होते. त्यातील यशस्वी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

डोक्यास मार लागल्याने एका इसमाचा मृत्यू

दै.रायगड नगरी । पनवेल

कळंबोली येथे बस स्टॉप जवळ फूटपाथ वर पडून डोक्यास मार लागल्याने त्याचा मृत्यू झाला आहे.याप्रकरणी कळंबोली पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. सीमांत रोगाई नेपाळ वरून रत्नागिरी येथे जाण्यासाठी कळंबोली बस स्टॉप जवळ उभा असताना फुटपाथवर पडल्याने त्याच्या डोक्यास मार लागला यात त्याचा मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध कळंबोली पोलिस करीत आहेत.

खिडूकपाडा परिसरात आढळला मृतदेह

दै.रायगड नगरी । पनवेल

तालुक्यातील खिडूकपाडा परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून मृत इसमाचे नाव आझाद(पूर्ण नाव माहित नाही) वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे, केस काळे वाढलेले, दाढी मिशीचे केस काळे व वाढलेले, नाक सरळ, चेहरा चौकोनी असून अंगात सफेद रंगाचा पूर्ण बाह्यांचा शर्ट व सफेद रंगाची फुल पॅन्ट. या मृतदेहाच्या उजव्या हातावर गोंदलेले असून उजव्या दंडावर ७८६ व उर्दू भाषेत गोंदवले आहे. उजव्या हातात स्टीलचे ब्रेसलेट आहे.

टायटल व्हेरिफिकेशन सर्टीफिकेट करिता जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे : गिरवले, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहेत.

मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मौजे	सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार रु.पै.
गिरवले, ता.पनवेल	२४/२	०-९०-६० पोटखराबा ०-०४-८०	१७.६८

सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून सदर मिळकतीचे त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे गृहीत धरुन आमचे अशिलांस सदर मिळकतींचे टायटल व्हेरीफिकेशन सर्टीफिकेट/स्वामीत्वाचा तपासणीचा दाखला देण्यात येईल व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १६/१२/२०२०
पनवेल

सही/-
ॲड.प्रगती दिनेश ठाकूर
नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,
ऑफिस क्र.२२, वासुदेव बळवंत फडके
नाट्यगृहाजवळ, पनवेल रायगड
मो.नं.९१७२५६१११११

मा.पाठक साो
प्रो.जमा. रु.५०/- अर्जदारातर्फे वकील ॲड.स्वप्नील व्यं.जाधव

जाहीर नोटीस

मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.६०८/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.२९/१/२०२१

श्री.राजन दत्तात्रेय पितळे अर्जदार

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.शकुंतला दत्तात्रेय पितळे यांचे दि.२१/०२/२०१९ रोजी टाईप बी १०, चौथा मजला, बिल्डींग नं.११, सेक्टर १३, नवीन पनवेल, जिल्हा : रायगड या त्यांच्या राहत्या घरी निधन झाले.

कै.शकुंतला दत्तात्रेय पितळे यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पुढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील सदनिका मिळकत चौथा मजला, टाईप बी १०, बिल्डींग नं.११, सेक्टर १३, नवीन पनवेल, जिल्हा : रायगड

मयत कै.शकुंतला दत्तात्रेय पितळे यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै.शकुंतला दत्तात्रेय पितळे यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दि.१६/१२/२०२० रोजी आमच्या सहीने व न्यायलयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

फरार झालेल्या आरोपीस पोलिसांकडून अटक

तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा मयत महिला लीपी सागोर शेख हिचे इतर इसमासोबत असलेल्या अनेतिक संबधाचा राग मनात धरून तिचा खून केला असे सांगितले आहे. आरोपी वय २४ वर्षे रा रा.रूम नं.जुबेर चाळ, ए/३, हार्मोनी बिल्डिंग जवळ, खर्डी रोड,मुंब्रा, भारत गिअर कंपनीचे समोर, ता. ठाणे, जि. ठाणे मुळ रा.नारायणपुर, पो. गाजीहार, थाना-कलीया, जि. नौडाईल, देश- बांग्लादेश यास अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपी यास मा.न्यायालयासमोर हजर केले असता मा. न्यायालयाने त्यास पोलीस कोठडी दिलेली आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास बिपीन कुमार सिंह, मा. पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई, डॉ. जय जाधव, मा. पोलीस सह आयुकत, नवी मुंबई, शिवराज पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२ पनवेल , रविंद्र गिड्डे , सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, सतीश गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कळंबोली पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) दिलीप गुजर, कळंबोली पोलीस ठाणे हे करीत आहेत.

आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ

खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सी.सी. भगत, समीर कदम, नंदकुमार म्हात्रे, शशिकांत शेळके, रमेश खडकर, भाऊ भगत, मानाजी पाटील, चंद्रकांत कडू, युवा मोर्चा खारघर अध्यक्ष विनोद घरत, अल्पसंख्यांक समाजाचे नेते मन्सूर पटेल, साजिद पटेल, गुलजार पटेल, सचिन वास्कर, मोतीराम जोशी, प्रकाश जोशी, निर्दोष केणी,मुनाफ पटेल, जगदिश घरत, नाना भगत, प्रल्हाद चिमणे, लक्ष्मण भातोसे, संतोष पाटील, महेश रेवणे, हर्षवर्धन पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष व कार्यतत्पर लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल विधानसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकासकामे होऊन पनवेलच्या विकासाचा आलेख उंचावला आहे. त्याच अनुषंगाने त्यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून महानगरपालिका क्षेत्रातील शहरांसह गावांमध्येही विकास केला जात आहे.

१० मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस

या ठिकाणी त्यांचे मार्गदर्शनाखाली, सहा. पोलीस निरीक्षक गणेश कराड, सहा. पोलीस निरीक्षक संदीप गायकवाड, सहा. पोलीस निरीक्षक प्रविण फडतरे, व पथक यांनी पनवेल रेल्च स्टेशन परीसराजवळ सापळा लावला असता वाहन चोरी अभिलेखावरील गुन्हेगार आकाश राजेश कहार उर्फ साई, वय २३ वर्षे, धंदा-कॅट्रेस, रा.पी.एल. लोखंडे मार्ग, मुकुंद नगर, साईबाबा मंदीर जवळ, चेंबुर, मुंबई. हा मिळुन आला. त्यास गुन्हे शाखा, कक्ष २ पोलीसांनी ताब्यात घेवून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने त्याचेकडे ताब्यात मिळुन आलेल्या मोटार सायकलबाबत चौकशी केली असता, आरोपीताने कंळबोली परिसरातुन मोटार सायकल चोरी केल्या असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीकडे अतिशय कौशल्यपुर्ण तपास करून एकुण १२ चोरीच्या मोटार सायकल अंदाजे एकुण ५,७७,०००/- रू किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करून त्याने एकुण १० मोटार वाहन चोरीचे गुन्हे केले असल्याचे कबुली दिली आहे. तसेच सदरचा अटक आरोपी हे वेगवेगळूया ठिकाणावरून मोटार सायकल चोरी करून वेगवेगळ्या ठिकाणी पार्कीग करीत असत आणि सदरचे गुन्हे हा तो मोटार सायकलचे स्पेअर पार्टस् विकण्याच्या उद्देशाने मोटार सायकली चोरी करीत असे, सदरचे गुन्हे अल्पावधीतच उघडकीस आणण्याची उल्लेखनीय कामगिरी गुन्हे शाखा, कदम २, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे, सहा. पोलीस निरीक्षक गणेश कराड, सहा. पोलीस निरीक्षक संदीप गायकवाड, राहा. पोलीरा बिरीदाक प्रविण फडतरे, पोलीस उप निरीदाक वैभवकुमार रोंगे, पोलीस हवालदार सुनिल सांळुके उनिल पाटील, राचिन पवार, रणजित पाटील, तुकाराम सुर्यवंशी, गधुकर गडगे, पोलीस नाईक सुनिल कुदळे, इंद्रजित वानु, रूपेश पाटील, राचिन म्हात्रे, प्रफुल्ल मोरे, पोलीस शिपाई संजय पाटील, आजिनाथ फुंदे यांनी केलली आहे.

बाबा राम सिंह यांची गोळी झाडून आत्महत्या

वाद मिटविण्यासाठी समिती स्थापन करण्याचे संकेत दिले आहेत. दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करणार्या शेतकर्यांनी रस्ता मोकळा करण्याच्या याचिकेवर सुनावणी झाली. हा देशव्यापी मुद्दा आहे. सरकारी संस्थांशी वाटाघाटी अयशस्वी ठरली. म्हणून आम्ही एक समिती स्थापन करू ज्यात सरकारसह आंदोलक शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील. तसेच देशातील त्या शेतकरी संघटनांचे लोक असावेत जे अद्याप आंदोलन करत नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.

बिबट्याचे मांस केले फस्त केल्याप्रकरणी दोघांना अटक

गणपत राघू वाघ (५५) यांना अटक करून त्यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांचे इतर दोन साथीदार फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. सर्वजण पालेखुर्द गावचे राहणारे आहेत. दिड महिन्यापूर्वी त्यांना जंगलात मृत बिबट्या आढळला होता.

त्याला जंगलातील झोपडीत नेवून जबडा वेगळा करून कातडी व नखे काढण्यात आली. यानंतर त्यांनी जंगलातच झोपडीत बिबट्याचे मांस शिजवून खाल्ल्याचे तपासात समोर आल्याचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी अपर आयुक्त डॉ. बी. जी. शेखर पाटील, उपायुक्त प्रवीणकुमार पाटील आदी उपस्थित होते. मृत बिबट्याचे मांस फस्त केल्यानंतर त्याची चार नखे व कातडी दोघांकडे ठेवली होती. तर जबडा व इतर नखे फरार असलेल्या दोघांकडे आहेत. बिबट्याचे कातडे, नखे तसेच जबडा विकण्याच्या प्रयत्न होता. परंतु मांस ताजे असल्याने त्यापासून येणाऱ्या दुर्गंधीमुळे त्यांनी ते स्वतःकडेच ठेवले होते. त्यांनी धरणालगत सापळा रचून या बिबट्याची हत्या केली असावी अशीही शक्यता पोलीस वर्तवत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

संजय गांधी निराधार योजना प्रलंबित प्रकरणे मार्गी लावा भाजपाची मागणी

दै.रायगड नगरी । तळा

सामाजिक उत्तरदायित्वातून अनाथ, निराधार, गरजू व अपंगांना आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाने विविध अनुदान योजना सुरू केल्या. राज्य सरकारने संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ योजना, तर केंद्र सरकारने इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ वेतन योजना व इंदिरा गांधी अपंग सहाय्यता योजना सुरू केल्या आहेत. या योजनांसाठी लाभार्थी निवडण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी संजय गांधी योजनेच्या तालुकास्तरीय समित्यांवर आहे. या समित्या तयार करण्याबाबत सरकारने अध्यादेश काढल्यानंतर समितीच्या अध्यक्षपदी पालकमंत्र्यांनी सूचवलेल्या सामाजिक कार्यकर्त्यांची निवड करण्याचे निर्देश त्यात आहेत. समितीच्या सदस्य सचिवपदी तहसीलदार आहेत. हा आदेश निघाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत पालकमंत्र्यांनी संबंधित सामाजिक कार्यकर्त्यांची व सदस्यांची नावे जिल्हाधिकार्यांना कळवणे आवश्यक असते.परंतु याप्रमाणे कार्यवाही होताना दिसत नाही. योजनेतून मिळू शकणारी आर्थिक मदत वंचितांच्या जगण्याची उमेद बनू शकते. मात्र, समित्या गठित न झाल्याने लाभार्थींची निवड रखडली आहे. समिती नसल्याने अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. समिती नसताना लाभार्थींची निवड करण्याचे अधिकार प्रांताधिकार्यांकडे आहेत. संजय गांधी निराधार योजनेतील प्रलंबित प्रकरणे त्वरित पाठपुरावा करुन मंजुर करावी यासाठी तळा तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने तळा तहसीलदार श्री.कनशेट्टी यांना लेखी निवेदन सादर केले यावेळी तालुका अध्यक्ष कैलास पायगुडे पत्रकार संजय रिकामे उपस्थित होते.तळा तहसीलदार यांनी निराधार योजनांची प्रलंबित प्रकरणां संदर्भात काम सुरु असुन लवकरात लवकर वंचितांना यांचा लाभ मिळेल असे आश्वासन यावेळी दिले.

सामाजिक बांधिलकी जपत वैभव देशमुख इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेडकडून ग्रामस्थांच्या सेवेसाठी रुग्णवाहिका

दै.रायगड नगरी । पनवेल

समाजाचे देणेदार लागतो या भावनेतून सामाजिक बांधिलकी जपत वैभव देशमुख इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड अर्थात व्हीडीआयपीएलच्या वतीने गव्हाण ग्रामस्थांच्या सेवेसाठी रुग्णवाहिका भेट देण्यात आली असून या रुग्णवाहिकेचे लोकार्पण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आज (दि. १६) करण्यात आले.

गव्हाण ग्रामपंचायत कार्यालय येथे झालेल्या या सोहळ्यास भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच हेमलता भगत, पनवेल महापालिकेचे नगरसेवक ऍडव्होकेट मनोज भुजबळ, उद्योजक अजय कांडपिळे, भाजपचे तालुका चिटणीस जयवंत देशमुख, कमलाकर देशमुख, ग्रामपंचायत सदस्य विजय घरत, सदस्या माई भोईर, कामिनी कोळी, उषा देशमुख, सुनिता घरत, भाजपनेते विश्वनाथ कोळी, अजय भगत, पनवेल शहर युवा मोर्चाचे सरचिटणीस गौरव कांडपिळे, पंकज पाटील, साईचरण म्हात्रे, किशोर पाटील, सुनील कोळी, शेखर देशमुख, वामन ठाकूर, व्हीडीआयपीएलचे व्यवस्थापकीय संचालक वैभव देशमुख, संचालक अमोल देशमुख, संचालक भाग्यश्री देशमुख यांच्यासह देशमुख कुटुंबिय, व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बोलताना, अशा सामाजिक भानातून माणुसकीचे दर्शन आणि समाजाप्रती असेलली आस्था प्रकट होत असल्याचे नमूद करून सामाजिक उपक्रमाबद्दल देशमुख कुटुंबियांचे कौतुक केले. वैभव देशमुख इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून सतत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याचप्रमाणे त्यांच्या मार्फत कोरोना काळात गरीब गरजूंना अन्नधान्य वाटप करून योगदान दिले होते.

व्हेंचर फाऊंडेशन तर्फे मुरुडमध्ये ब्लँकेट वाटप

दै.रायगड नगरी । कोर्लई

व्हेंचर फाऊंडेशन तर्फे मुरुड परीसरातील गोरगरीब आदिवासी बांधवांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विक्रांत राऊळ मान्यवरांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

व्हेंचर फाऊंडेशन तर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याचाच भाग थंडीच्या मोसमात गोरगरीब आदिवासी बांधवांना आधार उबदार ब्लँकेट वाटपाचा कार्यक्रम मुरुड मधील लेडिकुलसुम हॉस्पिटल समोरील चौलकर हॉलमध्य कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या अटि, नियम व शर्तीचे पालन करण्यात येऊन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

व्हेंचर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विक्रांत राऊळ, राष्ट्रीय संयुक्त सचीव के.डी.पाटील, रायगड जिल्हा उपाध्यक्ष तुफैल दामाद,महासचीव साकीब गजगे, मुरुड तालुका संयुक्त सचीव नगमाना खानजादा, संजीवनी आरोग्य सेवा संस्थेचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे,सामाजिक कार्यकर्ते महेंद्र चौलकर, लियाकत रोगे, मुस्लिम समाज सचीव मुत्सद्दीक कादीरी आदी. मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते मुरुडसह वाणदे, जोसरांजण, शिघ्रे, खारअंबोली, विहूर येथील शंभरहून अधिक गोरगरीब आदिवासी बांधवांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

सख्या काकाने केला पुतणी वर लैंगिक अत्याचार

दै.रायगड नगरी । पनवेल

सख्या काकाने आपल्या राहत्या घरी असलेल्या गेस्ट रूममध्ये पीडित मुलीस जबरदस्तीने वारंवार नेऊन तिची अंतर्वस्त्र काढून लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार सदर पीडित मुलीच्या आईने तळोजा पोलीस स्थानकामध्ये केली आहे.

चांद पापा उर्फ चांद मुस्ताक अन्सारी याने त्याच्या राहत्या घरी असलेल्या गेस्ट रूम मध्ये पाच वर्षीय पीडित मुलीला वारंवार बोलावून तिच्या वर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक काशिनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल राजवाडे व सहाय्यक पोलीस निरीक्षक निकम या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

पनवेल महानगरपालिका
ई-निविदा नोटीस

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून ई-निविदा पद्धतीने निविदा मागवित आहेत. खालील कामाचे निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.१७/१२/२०२० ते दि.११/०१/२०२१ पर्यंत दुपारी १५.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर ई-निविदा दि.१७/१२/२०२० ते दि.११/०१/२०२१ पर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत कार्यप्रणालीद्वारे ऑनलाईन स्वीकारण्यात येतील.

अ.क्र.	कामाबाबत तपशिल	बयाणा रक्कम	कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत
१	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक / सामुदायिक शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर देणेबाबत.	रु.५,००,०००/-	रु.५२५/- (जी.एसटी.सह)

सही/-
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

सुतारवाडी पंचक्रोशीत अवकाळी पाऊस, भाताच्या मळण्या भिजुन भाताचे नुकसान

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

गेल्या आठवड्यापासून हवामानाच्या अंदाजानुसार अवकाळी पाऊस पडत आहे. या अवकाळी पावसामुळे अनेकांची धावपळ झाली. काही ठिकाणी अद्यापही भाताच्या मळण्या तशाच आहेत. भात झोडणी झालेली नाही. निजामपूर येथील काही ग्रामस्थांनी अद्यापही झोडणी केलेली नव्हती. अशांची भाताची मळणी अवकाळी पडणाऱ्या पावसात भिजून गेली. यामुळें शेतकऱ्यांच्या भाताचे गोठया प्रमाणात नुकसान झाले आहे.

यावर्षी पावसाने उच्चांक केला होता. जून महिन्यात वादळी वाऱ्याने थैमान घालून अनेकांची घरे उद्ध्वस्त केली. त्यानंतर सातत्याने पडत असलेल्या पावसाने अनेकांच्या शेतीची नासधूस केली. यात शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर भरडला गेला. आता मात्र काहींच्या हाती आलेला घास अवकाळी पाऊस हिरावून घेत आहे. डिसेंबर महिन्यात बहुदा पाऊस पडत नाही मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे आता उन्हाळ्यात केव्हाही पाऊस पडत असल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. अवकाळी पडत असलेल्या पावसामुळे दिवाळीमध्ये ज्यांनी आपल्या घरासमोर जमीन केल्या होत्या त्या पूर्ववत झाल्या आहेत. आता पुन्हा जमिनी कराव्या लागणार आहेत. या अवकाळी पावसामुळे आंबा पिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

भक्ती केली तर वैराग्य प्राप्त होते : कोल्हाटकर

दै.रायगड नगरी । गोवे

स्वानंद सुख निवासी गुरुवर्य अलिबागकर महाराज प्रेम वर्धक वारकरी संप्रदायाच्या माध्यमातुन ५२ वर्षे सुरू असणारी रोहा ते आळंदी पायी दिंडी सोहळा कोरोनामूळे रद्द करण्यात परंतु संत ज्ञानोबा यांच्या संजीवन समाधी सोहळ्या निमीत्त दीड दिवसाचा अखंड हरिनाम सोहळा आयोजित करण्यात आला.या किर्तन सेवेत भक्ती केली तर वैराग्य प्राप्त होते असे मत आयोजित किर्तन सेवेत ह.भ.प. मारुती महाराज कोल्हाटकर यांनी व्यक्त केले.

भक्ती केली तर वैराग्य प्राप्त होते हे स्पष्ट करतांना गुरुवर्य ह.भ.प.मारुती महाराज कोल्हाटकर यांनी सांगितले की विठ्ठलपंत हे वैराग्याचे प्रतीक होते तर त्यांची पत्नी रुक्मिणी भक्तीची प्रतिक होती. यांच्या मिलनाने ज्ञानेश्वरांचा जन्म झाला. त्यांनी सर्व विश्वाला भक्तिचा मार्ग दाखवला. यामुळे जो पर्यंत चंद्र सूर्य आहेत. तोपर्यंत ज्ञानोबाचे नाव राहील नव्हे, नव्हे, जोपर्यंत ज्ञानेश्वरांचे नाव आहे. तोपर्यत चंद्र सूर्य राहतील त्यामुळे परमार्थ्याचे चिंतन केले पाहिजे. त्यांनी इन्द्रिय, हात, पाय, कान, देह दिला त्यामुळे त्याचे भजन जमेल त्या ठिकाणी केले पाहिजे.

मा.बहिर साहेब
प्रो.जमा. ६-२५

अर्जदाराचे वकील
ॲड.दिपक आर.शेळके

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज (सि.डी./ज्यु.डी.) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४९५/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२०/१/२०२१

१) मनदिप रामक्रिशन सैनि
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.साई स्वर्ग, रुम नं.११०३, प्लॉट नं.बी ३५,
एमटीएनएल ऑफिस जवळ, सेक्टर ६,
न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) रेणू सुरजित सिंग भेला
पुर्वाश्रमीची रेणू रामक्रिशन सैनि
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सुरजित सिंग भेला, न्यू आडगाव नाका,
ब ४५, भेला कॉटेज विजय नगर, पंचवटी,
नाशिक, महाराष्ट्र ४२२००३ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.हरविंदर कौर सैनी हे दिनांक १३/०७/२०१३ रोजी रा.रुम नं.११०३, साई स्वर्ग टॉवर, प्लॉट नं.३५, सेक्टर ६, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांची कै.ग्यान ज्ञान कौर ह्या दि.१३/०२/२०१७ रोजी रा.होशियारपूर पंजाब येथे मयत झाल्या आहेत. त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील फ्लॅट नं.११०३, अकरावा मजला, साई स्वर्ग, प्लॉट नं.बी ३५, सेक्टर नं.६, क्षेत्र ८३६. ०५२ चौरस फुट बांधीव मिळकत

कै.हरविंदर कौर सैनी यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १६/१२/२०२० रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.भाकरे साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६६९/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.६/२/२०२१

१) श्रीमती.सुमन चंद्रकांत भगत
वय : ६२ वर्षे, धंदा : घरकाम
२) श्री.राजू चंद्रकांत भगत
वय : ३८ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्री.संदीप चंद्रकांत भगत
वय : ३७ वर्षे, धंदा : व्यवसाय
४) श्री.हरेश चंद्रकांत भगत
वय : ३४ वर्षे, धंदा : रिक्षा चालक
५) सौ.सिता स्वागत पाटील
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.मु.पो.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.१ यांचे पती म्हणजेच अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील चंद्रकांत नामदेव भगत दि.०५/०८/२०२० रोजी मौजे : जुई-कामोठे, ता.पनवेल येथे मयत झाले आहेत. सदर मयत चंद्रकांत नामदेव भगत यांच्या नावे खाली नमूद केलेल्या सदनिका, व्यापारी गाळे, आहेत त्यांचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :

व्यापारी गाळे व सदनिकांचे वर्णन
मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील
सेक्टर ७ मधील भूखंड क्र.३ वरील गंगाधर कॉम्प्लेक्स मधील

अ.क्र.	सदनिका/ शॉप क्र.	क्षेत्र
१	शॉप क्र.१	३७५
२	शॉप क्र.८	४४०
३	शॉप क्र.११	३१०
४	शॉप क्र.१२	३७०
५	शॉप क्र.१३	२९०
६	शॉप क्र.१९	२८०
७	शॉप क्र.२७	३२५
८	शॉप क्र.२८	३१०
९	सदनिका क्र. सी/००१	३७९
१०	सदनिका क्र. डी/१०४	३६९
११	सदनिका क्र. सी/२०१	३७९

तसेच मयत चंद्रकांत नामदेव भगत यांच्या नावे मौजे : कामोठे, ता.पनवेल येथे पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीत राहती घर मिळकत आहे. सदर घर मिळकतीचा क्र.३३५ असा आहे. त्याचप्रमाणे मयत चंद्रकांत नामदेव भगत यांनी त्यांचे हयातीत मौजे : दुंदरे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे क्र.५२/५/ब, एकूण क्षेत्र ० हे ३८ आर. ४ पॉ. ही जमीन मिळकत खरेदी केलेली आहे.

आता वर नमूद सर्व मिळकती मयत चंद्रकांत नामदेव भगत यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदारांच्या नावे होणे करिता त्यांनी संबंधित कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत चंद्रकांत नामदेव भगत यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१६ माहे १२ सन २०२० रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

पनवेल महानगरपालिका

जा.क्र./ सका/१३३८/२०२०
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : १५/१२/२०२०

पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची पुरवणी कार्यसूची
सभा सूचना क्र.३०, दिनांक १८/१२/२०२०

प्रति,
श्री./श्रीमती ----------
सदस्य / सदस्या,
पनवेल महानगरपालिका

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभेची पुरवणी कार्यसूची शुक्रवार, दिनांक १८/१२/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता पनवेल महापालिकेचे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या ठिकाणी Webex App द्वारे ऑनलाईन बैठक खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी, सदर बैठकीस खालील लिंक वर आपण आपल्या कार्यालयातून जॉईंट व्हावे.

Link : https://mh-dit.webex.com/mh-dit/j.php?MTID=mdbc4ecd6350e6d27eb6bb3b5f7cee165
Meeting Number : 176 719 9832
Password : RBmVJECJ933

सभा सूचना क्र. ३० दिनांक १८/१२/२०२० ची
पुरवणी विषय पत्रिका

विषय

३) मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज

(मुळ विषयपत्रिकेत अ.क्र. १ व २ तसेच पुरवणी विषयपत्रिकेत अ.क्र. ३ व ४ विषय समाविष्ट आहेत.)

५. पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली विभागातील सेक्टर क्र. ६ ई प्लॉट क्र. ०२ या गार्डन भूखंडाचा I.G.P.L कंपनीच्या CER फंडातून करणेस मान्यता देणेबाबत.

६. पनवेल महानगरपालिका क्षेत्राकरीता मोजे रोहिंजण येथील Rental Housing Scheme करीता पायाभूत सुविधा पुरविणेबाबत.

(मा. महापौर महोदया यांचे मंजुरीने व आदेशान्वये) (टि

सही/-
(तिलकराज खापर्डे)
महापालिका सचिव (प्र.),
पनवेल महानगरपालिका

संक्षिप्त...

खारघर मधील मैदाने खुली करा : नेत्रा पाटील

दै.रायगड नगरी । कळंबोली

केंद्र तसेच राज्य सरकारने कोरोंना संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर बंद केलेली सार्वजनिक ठिकाणे खुली केली आहेत उदा.सिनेमागृह,मॉल,मंदिरे आता जवळपास सर्वच सार्वजनिक ठिकाणे नागरिकांसाठी खुली (उघडी) केली आहेत. त्यानुसार खारघर शहरातील सर्वात मोठे व ज्याची जागतिक पातळीवर ओळख आहे असे सेंट्रल पार्क देखील सर्वसामान्य नागरिकांसाठी खुले करण्यात यावे अशी मागणी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी मा. आयुक्त पनवेल महानगरपालिका यांच्याकडे केली आहे.

खारघर शहरातील नागरिक, महिला,मुले व तरुण खेळाडू हे लोकप्रतिनिधी या नात्याने नगरसेवक म्हणून खारघर मधील सेंट्रल पार्क महापालिकेच्या ताब्यातील सर्व उद्याने नागरिकांसाठी खुली करण्याची मागणी सातत्याने करीत आहेत. सेंट्रल पार्क हे जगातील सर्वात मोठे पार्क असल्याचे सिडकोचे म्हणणे आहे. त्यामुळे सदर पार्कमध्ये मोठ्या प्रमाणात जागा ही नागरिकांना फिरण्यासाठी, चालण्यासाठी तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी मोठ्या प्रमाणात खेळणी देखील उपलब्ध आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी सामाजिक अंतर देखील राखता येईल असे नागरिकांचे म्हणणे आहे. तरी आपण सर्व सामान्य नागरिकांची मागणी लक्षात घेता खारघर येथील सेंट्रल पार्क तसेच पनवेल महानगरपालिका हद्दीतील खेळाची मैदाने,उद्याने खुली करावीत जेणेकरून खेळाडू व ज्येष्ठ नागरिकांना तिथे जाता येईल व आनंद घेता येईल.

तीन ते चार अज्ञात इसमांनी कुत्र्याला क्रूरपणे मारले ठार

दै.रायगड नगरी । पनवेल

कळंबोली वसाहतींमधील मोकळ्या मैदानात तीन ते चार अज्ञात इसमांनी एका चार ते पाच महिन्याच्या कुत्र्यास खूप क्रूरतेने मारहाण करून जीवे ठार मारल्याचा गुन्हा कळंबोली पोलिस ठाण्यात करण्यात आला आहे.

कळंबोली वसाहतीतील रोडपाली सेक्टर १६ येथील मोकळ्या मैदानात फिरणाऱ्या एका चार ते पाच महिन्याच्या कुत्र्यास अज्ञात तीन ते चार इसमांनी क्रूर पणे मारहाण करून ठार मारले आहे.

याबाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करताच भादंवि कलम ४२९, ३४ सहकलम ११ ड,प्रा.नि. वागण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सौ. कमला एकनाथ देशेकर यांच्या विरोधातील अविश्वास ठराव ग्रामसभेने केले नामंजूर

दै.रायगड नगरी । तळोजा

चिंध्रण ग्रामपंचायतीचे सरपंच सौ कमला एकनाथ देशकर यांच्या विरोधात भाजप,शेकप व शिवसेना या तीन पक्षाच्या आठ सदस्यांनी अविश्वासाचा ठराव मांडला होता. या अनुषंगाने पनवेलचे नायब तहसिलदार संजय मांडे व ग्रामसेविका वंदना अहिरे यांच्या उपस्थितीत दिनांक १५ डिसेंबर रोजी चिंध्रण ग्रामपंचायत कार्यालयात गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक पार पाडली.

या निवडणुकीमध्ये चिंध्रण गावातील मतदारांनी गुप्त मतदान केले. एकूण १३५१मतदान झाले. त्यामध्ये २३मत बाद ठरविण्यात आली. विरोधकांच्या बाजूने ६५३ मतदारांनी मतदान केले. सौ. कमला एकनाथ देशेकर यांना ६७५ मतदरांनी मतदान केले. २२ मतांनी सरपंच सौ. कमला एकनाथ देशेकर यांनी अविश्वास ठराव जिंकला. सौ. कमला एकनाथ देशेकर यांच्या विरोधातील अविश्वास

ठराव ग्रामसभेने नामंजूर केले. केला.

लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी तालुक्यात केलेल्या विकास कामावर विश्वास ठेवून व चिंध्रण गावातील विकास कामे पाहून पुन्हा एकदा चिंध्रण गावातील मतदारांनी चिंध्रण ग्रामपंचायतीचे भाजपचे सरपंच पदाचे उमेदवार सौ. कमला एकनाथ देशेकर यांना निवडून देवून गावाचा विकास करण्याची संधी दिली असल्याचे सौ.

> ज्या सदस्यांना २०१७ च्या थेट सरपंच पदाच्या ग्रामपंचायत निवडणूकीत एकनाथ देशेकर यांचा चेहरा पाहून गावातील सदस्यांना मतदारांनी निवडून दिले होते. त्याच सदस्यांनी विरोधकांना सोबत घेवून आमच्या विरूद्ध अविश्वास ठराव मांडला. हा अविश्वास ठराव तब्बल २२ मतांनी जिकून एकनाथ देशेकर यांनी आपल्या नेतृत्वाखाली सौ कमला एकनाथ देशेकर यांना निवडून आणून आपली ताकद विरोधकांना दाखवून दिली आहे.
>
> **सौ. कमला एकनाथ देशेकर सरपंच**

कमला एकनाथ देशेकर यांनी म्हटले आहे. पुन्हा एकदा चिंध्रण गावातील मतदारांनी सौ कमला एकनाथ देशकर यांच्यावर विश्वास दाखवत त्यांनाच पुन्हा एकदा सरपंच पदासाठी निवडून देवून विरोधी सदस्यांना एक चपराक दिली आहे. ज्या भापजच्या सदस्यांनी अविश्वास ठराव मांडला त्या सदस्यांना भाजपातून सहा वर्षासाठी निलंबित करण्यात आले असल्याची माहिती एकनाथ देशेकर यांनी दिली आहे.

> लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागदशनाखाली पुन्हा एकदा चिंध्रण ग्रामपंचायतीवर भाजपचा झेंडा फडकला आहे. सौ. कमला एकनाथ देशेकर यांचा विजय हा जनतेने दिलेला आशिर्वाद आहे. विरोधकांना जनतेने दिलेली हि एक चपराक आहे. विरोधकांना एकनाथ देशेकर यांचा चेहरा पाहून गावातील नागरिकांनी निवडून दिले होते. त्या सव भाजपच्या सदस्यांना भाजप पक्षातून सहा वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहे.
>
> **एकनाथ शेठ देशेकर, अध्यक्ष रायगड जिल्हा ओ.बी.सी. सेल**

कांतीलाल कडू यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार

दै.रायगड नगरी । मुंबई

माणसात देव दडलेला आहे. त्याची निष्काम सेवा केली की ती आपोआप भगवंताला पोहचते. कोविड काळात आपण अशीच मानवरुपी भगवंताची सेवा केलीत याचा मला अभिमान वाटतो, असे भावोदगार महामहिम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी काढले.

दादर येथील बाल मोहन विद्यार्थी उत्कर्ष पालक समिती यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते राज्यस्तरीय विविध क्षेत्रातील ३४ समाजसेवकांना कोविड योद्धा पुरस्काराने राजभवनातील शानदार समारंभातून गौरविण्यात आले. त्यावेळी महामहिम राज्यपाल कोश्यारी बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, सुरुवातीला कोरोनाची प्रचंड दहशत होती. मुंबई आणि इतर शहरातील काही हॉस्पिटलला भेटी देण्याचा माझा इरादा होता. परंतु, कोविडच्या दहशतीमुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मनाई केल्याची राज्यपालांनी स्पष्टोक्ती दिली. राज्यात, देशात कोरोना वाढत असताना आरोग्य सेवक, सफाई कामगार, पोलिस, सामाजिक कार्यकर्ते, विविध विभागातील कर्मचाऱ्यांनी कोविडशी दोन हात करून एकत्रितपणे. लढा दिल्याने आपले. कौतुक. करणे माझे सौभाग्य समजतो असेही भावपूर्ण उदगार त्यांनी काढले. भगवंतालाही स्तुती प्रिय आहे. संत-महतांनाही त्यांचे

कौतुक आवडते. मग कोविड काळात छातीचा कोट करून लढलेल्या आपल्यासारख्यांचा गौरव करणे तितकेच महत्वाचे असल्याचे सांगत राज्यपालांनी कोविड योद्ध्यांचा सत्कार केला.

डॉ. नूपूर कृष्णन, डॉ. जनार्दन देशपांडे (मुलुंड), कांतीलाल कडू (पनवेल), पुरुषोत्तमा पवार (वसई), संजय कदम (डोंबिवली), सुरेश डोमे (पोर्ट), हेमंत सामंत (दादर), पंकज मेहत्तर (शिवडी), स्वाती जाधव (दादर), नितीन. कोलगे (परेल), राजू काळे (चिंचपोकळी), गणेश आमडोसकर (वडाळा), जयराम नाईक (मुलुंड), प्रशांत म्हात्रे (कांदिवली), प्रशांत घाडी (लालबाग), विक्रम यादव (सांगली), किरण म्हात्रे (माजगाव), राजेंद्र साळसकर (काळाचौकी), विश्वास दाते (भांडुप), दीपक घाडीगावकर (दादर), हनुमंत कुंभार (सातारा), साईनाथ गवळी (बांद्रा), शशिकांत मुंबरे (काळाचौकी), संदेश पुरळकर (आग्रीपाडा, मुंबई), गणेश शिंदे (काळाचौकी), जयकुमार साठलेकर (नवी मुंबई), रवींद्र कदम (दादर), गजानन नार्वेकर (विरार), भावेश पवार (ठाणे), अमृता चव्हाण (शिवडी), ऋषीकेश साबळे, विकास येवले आणि संजय कुलकर्णी आदींना कोविड योद्धा पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमासाठी तानाजी नांगरे पाटील, राहुल हजारे, भारती देशपांडे, डॉ. राजू बंडगर, आयोजक राजेंद्र साळसकर, काशिनाथ माटल आदी जण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विजय कदम यांनी केले. राजभवनातील जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आयोजकांना उत्तम सहकार्य केले.

मोबाईल खरेदी करण्याच्या बहाण्याने फसवणूक; दोन आरोपी गजाआड

दै.रायगड नगरी । पनवेल

फ्लिपकार्ट ऑर्डर पार्सल बॉक्स मध्ये असलेले मोबाईल फोन खरेदी करण्याच्या बहाण्याने हातात घेऊन मोटार सायकल वरून पसार होणार्या दोघा जणांना व पो नि अजय कुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने गजाआड केले आहे.

मयूर मयूर मेहत्रे वय वर्षे २८ हा फ्लिपकार्ट मध्ये डिलिव्हरी बॉय म्हणून काम करीत असून तु कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी जवळ ऍपल कंपनीचे आय फोन मोबाईल देण्यासाठी आरोपी केशव कामत वय वर्षे २२ राहणार नवीन पनवेल व हरिकेश राजकुमार यादव राहणार नवीन पनवेल या दोघांनी संग करून सदर मोबाईल खरेदी करण्याच्या बहाण्याने हातात घेऊन मयूर मेहेत्रे याला काही कळण्याच्या आत त्यांच्याजवळ असलेल्या मोटार सायकलीवरून ते पसार झाले याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे व संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स पो नि शिंदे ,पोलीस उपनिरीक्षक सुनील तारमळे,पो हवा आयरे,पो ना परेश म्हात्रे, विनोद पाटील,पो शि गर्दनमारे, घुले,पराचुर,खेडकर,पो ना राउत, चौधरी ,पवार आदींच्या पथकाने सापळा रचून दोन्ही आरोपींना मोबाईल फोन व गुन्ह्यांमध्ये वापरलेली मोटारसायकल असा मिळून एक लाख ४४ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.याबाबत पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तारमळे करीत आहेत.

माथेरान पालिकेच्या विविध विषय समित्यांवर बिनविरोध निवड

दै.रायगड नगरी । माथेरान

आज माथेरान नगरपालिकेमध्ये विविध विषय समित्यांच्या सभापतींची बिनविरोध निवड करण्यात आली .

माथेरान नगरपालिकेच्या विषय समित्यांच्या सभापतींचा कार्यकाळ संपल्यानंतर आज येथील मुख्याधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विविध विषय सामित्यांची पालिका सभागृहात सभापतींची निवड करण्यात आली त्यामध्ये शिवसेना गटनेते प्रसाद सावंत यांची सार्वजनिक बांधकाम सभापती पदी, तर शिक्षण,कला,क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभापदी पदी उप नगराध्यक्षा पदाच्या दावेदार असणाऱ्या नगरसेविका प्रतिभा घावरे, तसेच स्वच्छता वैदयकीय सार्वजनिक आरोग्य पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीच्या सभापदी पदी आकाश चौधरी यांची पुन्हा नियुक्ती करण्यात आली , नियोजन व विकास समितीच्या सभापदी पदी शकील शेख अहमद पटेल यांची व महिला व बालकल्याण सभापती पदी खान सबिना गुलमोहमद उर्फ सोनम सचिन दाभेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. माथेरान नगरपालिकेमध्ये शिवसेनेची एकहाती सत्ता असल्याने ह्या वेळी विरोधी पक्षाचे सदस्य गैरहजर होते व ही निवडणूक फक्त औपचारिकता होती ह्यावेळी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत ,मुख्याधिकारी प्रशांत जाधव उपनगराध्यक्ष आकाश चौधरी व शिवसेनेचे सर्व सन्मानीय नगरसेवक उपस्थित होते.

तळोजामध्ये सहा वर्षीय मुलीशी अश्लील वर्तन

दै.रायगड नगरी । पनवेल

सहा वर्षीय पीडित मुलीस रूम मध्ये बोलावून तिथे जबरदस्तीने चुंबन घेऊन तिच्यावर लैंगिक हमला केल्याची तक्रार पीडित मुलीच्या कुटुंबीयांनी तळोजा पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

आरोपी क्रिशन जगदीश कुमार वय वर्षे ३२ राहणार तळोजा याने एका सहा वर्षीय अल्पवयीन मुलीस आपल्या रूमवर बोलावून तिचे जबरदस्तीने चुंबन घेऊन तिच्यावर लैंगिक हमला केला.

याबाबतची तक्रार दाखल होताच तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक काशिनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक सुधीर वाघ व सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर निकम आदींच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले आहे.

ग्रुप ग्रामपंचायत मांडला

मु.मांडला, पो.बोर्ली, ता.मुरुड, जि.रायगड

जा.क्र.ग्रा.पं.३३०/२०२० दिनांक १५/१२/२०२०

मुदतीची निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत मांडला करिता जन सुविधा योजना अंतर्गत सन २०२०/२०२१ अंतर्गत खालील कामाकरिता इच्छुक ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

क्र.	कामाचे नाव	अंदाज पत्रकीय रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी	निविदा सादर करण्याची				
				अंतिम तारीख	वेळ	सुरक्षा अनामत रक्कम ५%	इसारा रक्कम १%	निविदा फॉर्म फी
१	२	३	४	५	६	७	८	९
१	मांडला हद्दीतील अंतर्गत रस्ता करणे, ता.मुरुड जंजिरा	१,९७,०००/-	३१ मार्च २०२१	२१ डिसेंबर २०२०	सायंकाळी ०५.०० वा.पर्यंत	९८५०/-	१९७०/-	१००/-

अटी व शर्ती :-

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. आवश्यक असल्यास फी भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.

२) प्राप्त निविदा मंगळवार दिनांक २२/१२/२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजता ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय मांडला येथे उपस्थितांच्या समक्ष मा.सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येईल. व बिलाची रक्कम ग्रामपंचायती कडून तरतुदीनुसार अदा करण्यार येईल.

३) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्ट्रेशनचे दाखले सत्य प्रत केलेले असावेत. व प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा भरण्यात यावी.

४) कोणतेही एक किंवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच ग्रुप ग्रामपंचायत मांडला यांनी राखून ठेवला आहे.

५) सुरक्षा अनामत रक्कमे पैकी १% रक्कम कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी भरावी लागेल व उर्वरित रक्कम देयकातून कपात केली जाईल.

६) प्रत्येक देयकातून शासन निर्णया प्रमाणे रक्कमा वजा केल्या जातील. मा गटविकास अधिकारी साहेब पंचायत समिती मुरुड याजकडील तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली सदर काम करावयाचे असून काम समाधानकारक नसेल तर ते काम त्याच स्थितीत थांबवून कार्यारभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतिने राखून ठेवला आहे.

७) काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानतर एक वर्षा पर्यंत देखभाल दुरुस्ती संबधीत ठेकेदाराने करावयाचे.

८) कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.

९) इसारा रक्कम रोखीने ग्रा.पं.कार्यालयाकडे भरणा करावी.

१०) रजि.ठेकेदार न मिळालेस स्थानिक ठेकेदाराला प्राधान्य देण्यात येईल.

११) सविस्तर अटी व शर्ती करिता ग्रामपंचायत कार्यालयाकडे संपर्क साधावा.

सही/-
पी.जी.गाडेकर (ग्रामसेवक)
ग्रुप ग्रामपंचायत मांडला
ता.मुरुड, जि.रायगड

सही/-
सौ.सुचिता सुरेश पालवणकर (सरपंच)
ग्रुप ग्रामपंचायत मांडला
ता.मुरुड, जि.रायगड

मा.दि.न्या.श्री.पाठक साहेब यांचे न्यायालयात
वारसांचे सर्टिफिकेट बद्दल जाहीरनामा
प्रो.जमा. रु.५०/- दिवाणी अ. १५० रा.
Civ. A 150 m
ॲड.केशवन रविंद्रन
अर्जदार यांचे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयात पनवेल
चौ.अर्ज क्र.३३६/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.०९/२/२०२१

१) श्रीमती.वंदना सुनील देशमुख
वय : ५३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.सुरज सुनील देशमुख
वय : २९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) कु.जाई सुनील देशमुख
वय : २६ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.सदनिका क्र.बि-२०५,
गंगाधर टॉवर, विठ्ठल रुक्मिणी मंदिरा जवळ,
प्लॉट क्र.३३, सेक्टर ९, कामोठे,
नवी मुंबई ४१०२०९ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

वरील अर्जदार क्रं.१ यांचे पती व क्रं.२ व ३ यांचे वडील कै. सुनील बाबुराव देशमुख, यांचे दि.१५/११/२०१९ रोजी मुंबई येथे निधन झाले. मयत कै.सुनील बाबुराव देशमुख यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मालमत्तेचे वर्णन
सदनिका क्र. बी-२०५,
गंगाधर टॉवर, विठ्ठल रुक्मिणी मंदिरा जवळ,
प्लॉट क्रं.३३, सेक्टर ९, कामोठे,
नवी मुंबई ४१०२०९

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१६/१२/२०२० रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची घर मिळकत क्र.४१ क, त्या घर मिळकतींचे विद्यमान घरमालक यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असून, तसा करार उभयपक्षी यांचेत स्वाक्षरीत झाला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे : कोन ग्रुपग्रामपंचायत कोन दप्तरील
गावठाण घर मिळकत ४१ क चे वर्णन

मौजे कोन, ता.पनवेल, जि.रायगड
ग्रुप ग्रामपंचायत कोन मालमत्ता क्र./घर क्रं.४१ क
कौलारु, विटा, वाळू सिमेंट भिंतीचे घर
घराचे एकूण क्षेत्र ४०.१५ चौ.मी.
तसेच घरा सभोवतालची मोकळी जागा

वर वर्णन घर मिळकत क्र.४१ क ही घर मालमत्ता श्री.अनंता बळीराम म्हात्रे रा.मु.कोन, ता.पनवेल, जि.रायगड यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीतील असून विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान श्री.अनंता बळीराम म्हात्रे घर मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या घर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचेही विक्री, बक्षिसपत्र, कुलमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्री करार, वारसा हक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी, ताबा, कब्जा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, कुळ हक्क, दिवाणी दावा महसूल वाद अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांचे हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांचे आत खालील आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरुपात आणून द्यावीत. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची घर मिळकत क्र.४१ क ही विद्यमान घर मालकांच्या निर्वेध व निंजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान घर मालकांच्या तसेच आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १६/१२/२०२०

सही/-
ॲड.स्वप्नील सुरेश ठाकूर
शॉप नं.३१, पहिला मजला, पनवेल
महानगरपालिका कॉम्प्लेक्स, कृष्णाळे तलावाचे
विरुद्ध वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे बाजूला,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.नं.९२२२०३१९८९/८४२४००६१००